World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2019;5(10):128-129
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''पवित्रशास्त्र आणि त्याच्या परिणाम:-भाग-१''

## विश्वास गोरखनाथ वळवी

**Abstract**
The law of the Lord is perfect.
The scripture demands complete Christian literature. The law is perfect, just as Christian literature must be perfect in Christ and his theology. Because its effect is to improve your life skills, it gives peace to your soul, it makes your soul fresh and pure, so your soul is connected with God. The essence of Scripture and its consequences is needed in Christian literature. Christian literature must be perfect, that is, it must be preacher in Christ. God is glorified only through that literature. Scripture is given to us to reform it must be a spiritual reformer so that the Christian man is ready for every good deed.
The wording of Christian literature depends on the revelation of God. And we get these revelations from reading the Bible and various Christian literature. For example: - Who understands his mistakes? These mistakes help to understand through Christian literature. It helps to shape myself as a Christian. It inspires Christian society and its fellowship. Therefore, Christians should read Christian literature and biographies to become proficient in the knowledge and love of Christ.

**Keywords:** Christ. Scripture, Christian, Bible, Sin, God, Literature, Salvation, Testimony, Ignorance

**प्रस्तावना:**
ख्रिस्ती साहित्य हे लिखित साहित्य आहे.त्यामुळे ते ख्रिस्ती धर्मतत्वांना पूर्णत्वास नेणारे असले पाहिजे.येशु ख्रिस्ताचे बारा शिष्य हे मनुष्य होते आणि त्यांनी देवाच्या आत्म्याच्या प्रेरणेने ख्रिस्ती साहित्य शब्दरचनेत आणण्यात साध्य केले.आजचा ख्रिस्ती मनुष्य जो ख्रिस्ती साहित्य लेखन करतो तो देखील मनुष्यच आहे,पण त्यात देखील शिष्याप्रमाणे पवित्र आत्मा वास करतो आणि ख्रिस्ती साहित्य लेखन करण्यास त्याला प्रेरणा देऊन मदत करतो.स्रोतसंहिता १९ वा अध्याय आणि त्यामधील ७,८,९ या वचनावरून आपण हे समजून घेऊया.

**यहोवाचे नियमशास्त्र पूर्ण आहे.ते जीवाची सुधारणा करणारे आहे:-**
पवित्रशास्त्र ख्रिस्ती साहित्याची संपूर्ण मागणी करते.नियमशास्त्र परिपूर्ण आहे त्याचप्रमाणे ख्रिस्ती साहित्य देखील ख्रिस्तात आणि त्याच्या धर्मतत्वात परिपूर्ण असले पाहिजे.कारण त्याच्या परिणाम तुमच्या जीवनकलांची सुधारणा करणारे आहे,तुमच्या जीवाला ते शांती प्रदान करते,तुमच्या जीवाला ताजे आणि निर्मळ बनविते,त्यामुळे तुमचा जीव देवाशी जडलेला असतो.ख्रिस्ती साहित्यातून देखील पवित्रशास्त्र आणि त्याच्या परिणामतेचा सुगंध येणे अत्यंत गरजेचे आहे.ख्रिस्ती साहित्य परिपूर्ण असले पाहिजे म्हणजे ते ख्रिस्तात प्रचार करणारे असले पाहिजे त्या साहित्यातून फक्त आणि फक्त देवाची महिमा होणे क्रमप्राप्त आहे.पवित्रशास्त्र हे सुधारणा करण्यासाठी आपल्यांना दिले गेलेले आहे.त्याचप्रमाणे ख्रिस्ती साहित्य हे आध्यात्मिक सुधारणा करणारे हवे.जेणेकरून ख्रिस्ती व्यक्ती प्रत्येक चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा.

**यहोवाची साक्ष खरी आहे.ती अज्ञान्यास ज्ञानी करणारी आहे:-**
सुवार्ता ही ख्रिस्ताचा साक्षीवर अवलंबून आहे.आणि त्यामुळे ख्रिस्ताने आम्हाला संपूर्ण जगात साक्षी होण्यासाठी पाठविलेले आहे.ख्रिस्त आणि त्याची साक्ष खरी व सत्य आहे.अशी साक्ष जी संपूर्ण जगात प्रचारीत करण्यात आलेली आहे.ज्या साक्षीला गेल्या दोन हजार वीस वर्षात कोणतीही सैतानी शक्ती रोखू शकली नाही.ही साक्ष या विश्वाची ज्योती आहे,तारणाचा मुख्य आधार आहे,मार्ग-सत्य-जीवन

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

आहे,ही साक्ष पापाचा समूळ नाश करणारी आहे,ही साक्ष सैतानावर आणि मृत्यूवर विजय संपादित करणारी आहे.तिचे नाव आहे प्रभू येशु ख्रिस्त.हा ख्रिस्त मनुष्याचे अज्ञान दूर करून त्याला ज्ञान पाजनारा आहे.ख्रिस्ती साहित्य देखील याच साक्षीवर आधारित हवे.ते अज्ञान नाही पण ख्रिस्ताचे ज्ञान पाजणारे असायला हवे,त्या साहित्यातून ख्रिस्ताची साक्ष प्रदर्शित व्हायला हवी,आमोस नबी लिहितो "माझी प्रजा अज्ञानाने नाश पावत आहे." त्यामुळे कोणतेही ख्रिस्ती साहित्य हे ख्रिस्ताला आणि ख्रिस्ताचे ज्ञान देणारे हवे.

**यहोवाचे निर्बंध निर्मळ आहे.ते हृदयाला आनंदवितात:-**

पवित्रशास्त्र आपल्यांना हे दाखवून देते की देवाला पापाचा धीट आहे.आणि तो कधीही बदलत नाही,त्याच्या योजना सर्वकाळ टीकणाऱ्या आहेत.कोणतेही ख्रिस्ती साहित्य हे पापाचा धीट करणारे असायला हवे.त्या साहित्यातून अंतिम निष्कर्ष हे शास्त्राला लागून असायला हवे.पापामुळे आज संपूर्ण जग पिडलेले आहे.ख्रिस्ताने आपले बलिदान देऊन लोकांना तारणाचा मार्ग खुला करून दिलेला आहे.आणि हाच मार्ग ख्रिस्ती साहित्यातुन प्रदर्शित व्हायला हवा.तेव्हाच त्याला ख्रिस्ती साहित्य म्हणता येईल.आणि ते सर्वकाळ टिकणारे म्हणजे शास्त्रावर आणि ख्रिस्ताच्या प्रचारार्थ नेहेमी तत्पर आणि योग्यतेवर आधारलेले हवे.ख्रिस्ती साहित्य शब्दरचनेत शब्दबद्द करणारी व्यक्ती ही काही साधारण व्यक्ती नव्हे,त्या व्यक्तीला बायबलच्या संपूर्ण ज्ञानाबरोबर आत्मिक प्रबळतेत अविरतपणे चालणे अत्यंत महत्वाचे आहे.कारण देवाकडून वारंवार प्रकटिकरणाचा अनुभव करून त्याला ते साहित्याच्या माध्यमातून लिखित करावे लागते.यासाठी की लोकांनी ते वाचून ख्रिस्ताला नीट जाणून आणि समजून घ्यावे.

ख्रिस्ती साहित्य हे पवित्रशास्त्र आणि पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनावर आधारित आहे.त्यामुळे बायबलमध्ये ख्रिस्ती साहित्य कोणते असावे? त्याचे प्रकार कोणते? ख्रिस्ती साहित्याचे आधारस्तंभ कोणते? या सर्व प्रश्नांची उत्तरे प्राप्त होतात.ख्रिस्ती साहित्याचे शब्दनिशब्द देवाच्या प्रकटिकरणावर अवलंबून आहे.आणि ही प्रकटिकरणे आम्हाला बायबल आणि वेगवेगळ्या ख्रिस्ती साहित्य वाचनातुम प्राप्त होतात.उदा:-स्वतःच्या चुका कोणाला समजतात? या चुका ख्रिस्ती साहित्याच्या माध्यमातून समजण्यास मदत होतात.स्वतःला ख्रिस्ती म्हणून घडविण्यात मदत होते.ख्रिस्ती समाज आणि त्याची संगती ठेवण्यास प्रेरणा देतात.त्यामुळे ख्रिस्ती व्यक्तींनी ख्रिस्ती साहित्य आणि आत्मचरित्र वाचायला हवी जेणेकरून त्याने ख्रिस्ताच्या ज्ञानात आणि प्रीतीत पारंगत व्हावे.

**संदर्भसूची:-**

1. स्रोतसंहिता १९-वचन-७-१०.जुना करार.पवित्रशास्त्र